

दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज

मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार

# रायगड नगरी

गणपती बाप्पा मोरया

रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित

● वर्ष १७ वे ● अंक १५४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.३ सप्टेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## नौदलाचा नवा ध्वज छत्रपती शिवरायांना समर्पित : पंतप्रधान

# आयएनएस विक्रांत भारतीय नौदलाच्या लढाऊ ताफ्यात सामील

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**भारतीय नौदलाच्या झेंड्यावर आतापर्यंत गुलागिरीचं निशाण होतं. पण आज २ सप्टेंबर २०२२ या ऐतिहासिक तारखेला इतिहास बदलून टाकणारं काम आपण केलंय. आज भारताने गुलामगिरीचे ओझं झेंड्यावरुन पुसून टाकलंय. आजपासून भारतीय नौदलाला नवा झेंडा मिळाला आहे. तो झेंडा आपण नौदलाचे प्रणेते छत्रपती शिवरायांना समर्पित करतो आहोत, अशी मोठी घोषणा करतानाच नौदलाचा नवा झेंडा आता समुद्रात आणि आकाशात डौलाने फडकेल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.**

देशाची पहिली विमानवाहू युद्धनौका आयएनएस विक्रांत भारतीय नौदलाच्या लढाऊ ताफ्यात सामील झाली आहे. केरळमधील कोची येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला. यावेळी केलेल्या भाषणात आयएनएस विक्रांत युद्धनौकेचं महत्त्व पंतप्रधान मोदींनी अधोरेखित केलं.

> आधीच्या ध्वजावर पूर्वीच्या दोन लाल रेषा होत्या. त्या लाल रेषा आता काढून टाकण्यात आल्या आहेत. त्यांना सेंट जॉर्जेस क्रॉस म्हटलं जायचं. ज्या ब्रिटिशांच्या राजवटीपासून तशाच राहिल्याचं सांगितलं जातं. आता मात्र नव्या झेंड्यावर एका बाजूला भारताचा तिरंगा दिसणार आहे, तर त्याच्या बाजूला नौदलाचं बोधचिन्ह दिसणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, आज भारत जगातील त्या देशांमध्ये सामील झाला आहे, जे देश स्वदेशी तंत्रज्ञानाने एवढी मोठी विमानवाहू युद्धनौका तयार करतात. आज आयएनएस विक्रांतने देशाला नवा आत्मविश्वास दिला आहे. आयएनएस विक्रांतच्या प्रत्येक भागाचे वैशिष्ट्य आहेत, एक ताकद आहे, स्वतःचा विकास प्रवास आहे. आयएनएस विक्रांत म्हणजे स्वदेशी क्षमता, स्वदेशी संसाधने आणि स्वदेशी कौशल्यांचे प्रतीक आहे. त्याच्या एअरबेसमध्ये बसवलेले स्टीलही स्वदेशी आहे.



विक्रांत विशाल आहे, विराट आहे, विहंगम आहे.. विक्रांत विशिष्ट आहे, विक्रांत खासही आहे. विक्रांत ही केवळ युद्धनौका नाही. २१ व्या शतकातील भारताच्या कठोर परिश्रम, प्रतिभा, प्रभाव आणि वचनबद्धतेचा हा पुरावा आहे

छत्रपती शिवाजी महाराजांचं नौदलातील योगदान अधोरेखित करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, सागरी शक्तीच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी असं नौदल उभारलं, ज्याने शत्रूंची झोप उडवली. इंग्रज भारतात आले तेव्हा त्यांना भारतीय जहाजांची ताकद आणि त्याद्वारे होणाऱ्या व्यापाराच्या ताकदीचा धाक होता. आतापर्यंत भारतीय नौदलाच्या ध्वजावर गुलामगिरीची ओळख होती. मात्र आता छत्रपती शिवरायांच्या प्रेरणेने आजपासून नौदलाचा नवा झेंडा समुद्रात आणि आकाशात फडकणार आहे. भारतीय नौदलाच्या झेंड्यावर आतापर्यंत गुलागिरीचं निशाण होतं. पण आज २ सप्टेंबर २०२२ या ऐतिहासिक तारखेला इतिहास बदलून टाकणारं काम आपण केलंय. आज भारताने गुलामगिरीचे ओझं झेंड्यावरुन पुसून टाकलंय. आजपासून भारतीय नौदलाला नवा झेंडा मिळाला आहे.



# राज्यात पुन्हा राजकीय भूकंप होणार?

## महाराष्ट्र काँग्रेसमधील आमदारांचा गट फुटण्याची शक्यता

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एकनाथ शिंदे यांच्यासह ५० आमदारांनी एक वेगळा गट स्थापन करत शिवसेनेला प्रचंड मोठा धक्का दिला. या बंडखोरीमुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. राजकीय सत्तासंघर्ष शिगेला गेला अन् महाविकास आघाडीचे ठाकरे सरकार कोसळले. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्रिपदाची आणि देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली.

सदर राजकीय घडामोडींना दोन महिनेच उलटले असताना राज्यात पुन्हा एकदा राजकारण वादळ निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. शिवसेनेनंतर आता महाराष्ट्रकाँग्रेसमधील काही माजी मंत्री आणि आमदार फुटणार असल्याची चर्चा रंगली आहे. तसेच येत्या ऑक्टोबर महिन्यात शिंदे-फडणवीस मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे. या विस्तारात काँग्रेसमधील एका गटाला स्थान मिळण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.

विधानपरिषदेच्या निवडणुकीत काँग्रेसची काही मतं फुटली होती. या निवडणुकीत महाविकास आघाडीकडून काँग्रेसनं २, राष्ट्रवादीने २ आणि शिवसेनेने २ उमेदवार उभे केले. या निवडणुकीत महाविकास आघाडीची मते फुटली. काँग्रेसच्या २ उमेदवारांपैकी एकाला पराभव सहन करावा लागला. या निवडणुकीत काँग्रेसचे चंद्रकांत हंडोरे यांचा पराभव झाला. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाची हक्काची मते फुटली. त्यामुळे याची दखल पक्षश्रेष्ठींनी घेतली होती.

विधान परिषदेच्या निवडणुकीत भाजपाला मतदान करणाऱ्या काँग्रेसच्या आमदारांची यादी पक्षश्रेष्ठीला देण्यात आली आहे. आमदारांमध्ये उत्तर महाराष्ट्रातील १, मराठवाड्यातील २-३ आणि मुंबईतील २ आमदार असल्याचं सांगण्यात येत आहे. या आमदारांनी विधान परिषदेत भाजपाला मतदान केले होते. त्यामुळे भाजपाच्या ५ व्या उमेदवाराचा विजय सोपा झाला होता.

विधान परिषदेत भाजपाचे प्रसाद लाड यांचा अटीतटीच्या लढतीत विजय झाला होता. त्यानंतर काँग्रेसमधील मते फुटीची दखल घेत अहवाल सादर करण्याचे निर्देश हायकमांडनं दिले होते. त्यावर आता अहवाल तयार होऊन तो दिल्लीलाही पाठवला होता.

# दिव्यामुळे लागलेल्या आगीत घराचे मोठे नुकसान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे सेक्टर ३६ मधील इंपिरियल हाईट ह्या १३ मजली इमारती च्या दुसऱ्या मजल्यावर दिव्यामुळे लागलेल्या आयाजित घराचे मोठे नुकसान झाले आहे.

कामोठे सेक्टर ३६ मधील इंपिरियल हाईट ह्या १३ मजली इमारती च्या दुसऱ्या मजल्यावर घरातील नागरिक दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन करण्यासाठी सर्व कुटुंब घर बंद करून गेले असता घरात तेवत असलेल्या दिव्यामुळे डेकोरेशन ने पेट घेतला तसेच इतर सामान, फर्निचरनेही पेट घेतला व गॅस सिलिंडरचाही स्फोट झाला. याआगीत मोठ्या प्रमाणात घराचे नुकसान झाले आहे. या घटनेची माहिती मिळताच अग्निशम दलास कळवण्यात आले. मात्र, तोपर्यंत घरातील बरंच साहित्य जळून खाक झालं होतं.



## संक्षिप्त...

### शिंदे गटाचा शिवाजी पार्कवर दसरा मेळाव्यासाठी अर्ज

**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेल्या अनेक वर्षांपासून शिव-सेनेची ओळख असलेला शिवाजी पार्कवरील दसरा मेळावा हायजॅक करण्याच्यादृष्टीने आता शिंदे गटाने निर्णायक पाऊल टाकले आहे. शिंदे गटाकडून शिवाजी पार्कवर दसरा मेळाव्यासाठीच्या परवानगीचा अर्ज मुंबई महानगरपालिकेकडे सादर केला आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडून यापूर्वीच दसरा मेळाव्यासाठी परवानगी मागण्यात आली होती. मात्र, मुंबई महानगरपालिकेने ही परवानगी रोखून धरली होती. त्यानंतर आता शिंदे गटानेच शिवाजी पार्कवर मेळावा घ्यायचे ठरवले आहे. पालिकेकडे अर्ज सादर करून शिंदे गटाने तशा हालचालीही सुरु केल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आता शिवसेनेकडून पहिली प्रतिक्रिया आली आहे. शिवसेनेच्या नेत्या किशोरी पेडणेकर यांनी या मुद्द्यावरु शिंदे गटावर टीकास्त्र सोडले आहे. शिंदे गटाकडून बाळासाहेब ठाकरे यांचे नाव घेतले जाते आणि दुसरीकडे ढोंगीपणा केला जातो. शिवाजी पार्कवरील शिव-सेनेचा दसरा मेळावा रोखणे, हा म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांचा अपमान आहे. बाळासाहेबांनंतर उद्धव ठाकरे यांनी दसरा मेळाव्याची परंपरा पुढे नेली. मात्र, आता त्यामध्ये खोडा घातला जात आहे. हा कायदा-सुव्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न आहे. नुसते शाब्दिक फवारे उडवून हिंदुत्व सिद्ध होत नाही. ही शिवसेनेची ५६ वर्षांची परंपरा आहे. त्याला ब्रेक देऊ नका. मी हात जोडून विनंती करते की, असे करु नका. कारण ज्याच्या हातात सत्ता आहे, त्याचे परिणाम लोकांना दिसत आहेत, असे किशोरी पेडणेकर यांनी म्हटले.

# विषारी जेली फिश माशांची दहशत

## खलाशांनी बोटी नांगरून ठेवण्याचा निर्णय

**दै.रायगड नगरी । उरण**

वातावरणातील बदलामुळे, समुद्रातील वाढत्या प्रदुषणामुळे मासे मिळणे अवघड झाले आहे.त्यातच आपल्या बोटी समुद्रात मासेमारीसाठी दूरवर घेऊन जात आहेत.परंतु सध्या विषारी जेली फिश मासे समुद्र किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात आढळून येत समुद्रात विषारी जेली फिश माशांची संख्या बळावली असल्याने समुद्रात मासेमारीसाठी जाणाऱ्या खलाशांनी जेली फिश या विषारी माशांमुळे आप आपल्या बोटी किनाऱ्यावर नांगरुन ठेवल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.तरी गणे-शोत्सवा निमित्ताने समुद्रात गणेश मुर्ती विसर्जन करण्यासाठी जाणाऱ्या गणेशभक्तांनी खबरदारी घ्यावी अशी सूचना कुंदन नाखवा जयवंत कोळी यांनी केली आहे.



करंजा गावातील महेंद्र नाखवा, कुंदन नाखवा, जयवंत कोळी यांनी माहिती देताना सांगितले की दिवसेंदिवस समुद्रात प्रदुषण वाढ आहे.अशा वाढत्या प्रदूषणामुळे आणि वातावरणातील बदलामुळे मासे मिळणे अवघड झाले आहे. तरी ही मच्छिमार बांधव हे आपला जीव धोक्यात घालून आप आहेत.सदर जेली फिश मासे जाळ्यात अडकल्यावर मासेमारी करणाऱ्या खलाशांना, कोळी बांधवांना डंक मारत आहेत.

…/२

# कशेडी घाटात कोसळलेल्या ट्रकमधील चालकाला वाचविण्यात यश

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वरील भोगाव येलंगेवाडी ते धामणदिवीदरम्यान दरवर्षी खचणाऱ्या रस्त्यापूर्वीच्या वळणावर कशेडी घाट उतरून भरधाव वेगाने येणारा एक ट्रक गुरूवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास तब्बल १५० फूट दरीमध्ये कोसळला. या ट्रकमधील जखमी जायबंदी चालकाला पोलीस कर्मचारी व स्थानिक ग्रामस्थांनी बाहेर काढले असले तरी या अपघातात या ट्रकमधून रोहा एमआयडीसीपर्यंत वाहून नेले जाणारे क्लोरिन गॅस सिलींडर शाबूत राहिल्याने संभाव्य गॅसगळती टळली आहे. ट्रकच्या ब्रेकफेलमुळे हा अपघात झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

पोलादपूर तालुक्यातील कशेडी घाटामध्ये गुरूवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास आंध्रप्रदेश येथील एक ट्रक(एपी २१ टीवाय १४४९) रोहा औद्योगिक वसा-हतीमध्ये क्लोरिन गॅसचे सिलींडर घेऊन जात असताना तीव्र वळण उतारावर ब्रेक फेल झाल्याने थेट दरीमध्ये सुमारे दीडशे फूट खोलपर्यंत झेपावला. यावेळी ट्रकचे टायर्स हे ट्रकच्या मालवाहू हौद्यापासून वेगळे झाले. या अपघात ट्रक चालक लक्ष्मीरेड्डी

…/२





# केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचे संघर्ष समितीच्यावतीने आभार



केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांचे लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने त्यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन आभार मानले.

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवी मुंबईच्या विकासात असलेले लोकनेते दि. बा. पाटील यांचे योगदान आणि स्थानिकांच्या विविध संघटनांची मागणी विचारात घेता नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नामकरण लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई विमानतळ असे करण्यास राज्य विधिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान नामकरणाचा ठराव विधानसभा आणि विधान परिषदेत मंजूर करण्यात आला. त्या अनुषंगाने दिबांचे नाव विमानतळाला देण्याबाबत उभारलेल्या लढ्याला पाठींबा व शासनदरबारी सहकार्य करणारे

यावेळी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, सल्लागार माजी खासदार जगन्नाथ पाटील, जे. डी. तांडेल, दिबांचे चिरंजीव अतुल पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी उपमहापौर जगदीश गायकवाड, राजेश गायकर, दीपक म्हात्रे, मनोहर पाटील, विनोद म्हात्रे यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

# मुंब्रा येथे दरड कोसळून घरात झोपलेल्या महिलेचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । ठाणे**

ठाण्यातील मुंब्रा येथे दरड कोसळून एका ३५ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. संध्याकाळी ५ ते ६ वाजण्याच्या सुमारास पावसाची मोठी सर आली आणि त्यामुळे मुंब्रा बायपास नजीक असलेल्या डोंगरावरील जमिनीचा काही भाग सरकला. या दरडी सोबत एक भलामोठा दगड खाली वेगाने घरंगळत आला आणि बायपास जवळ असलेल्या चाळींवर जाऊन धडकला. यामध्ये दोन चाळींच्या काही घरांचे मोठे नुकसान झाले आहे.

या दरडीमुळे घरात झोपलेल्या एका महिलेचा मृत्यू झाला आहे. अद्याप धोका टाळला नसून या डोंगरावर अशा प्रकारचे मोठे दगड आहेत जे कोसळून आणखी मोठे नुकसान होऊ शकते. भविष्यात दगड कोसळण्याची शक्यता असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने डोंगराखालील वस्तीमधील एकूण १४ सदनिका रिकाम्या करून रहिवाश्यांची राहण्याची व्यवस्था नजीकच्या ठा.म.पाच्या शाळेमध्ये करण्यात आली आहे.

ठाण्यातील मुंब्रा परिसरात डोंगरावरील दरड कोसळून एका महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली असून या घटनेमध्ये दोन घरांचे मोठे नुकसान देखील झाले आहे. मुंब्रा गावदेवी, लाल किल्ला ढाबा जवळ, मुंब्रा बायपास रोडच्या बाजूच्या डोंगरावरील दगड कोसळली

…/२

# भरारीची पूर्वतयारी

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीतील विकासदराचे आकडे सुखावणारे आहेत. एप्रिल ते जून या पहिल्या तिमाहीत विकासदराने १३.५ अशी पातळी गाठली आहे. पहिल्या तिमाहीतील विकासाचा वेग हा नेहमीच पुढच्या तीन तिमाहींमध्ये वाढत जातो. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, भारतात दुसऱ्या तिमाहीत सण व उत्सवांना आरंभ होतो. तो पुढे दीर्घ काळ टिकतो. तो जसा आनंद व उत्साहाचा कालावधी असतो; तसाच अर्थवाढीचाही असतो. तिसऱ्या तिमाहीच्या आरंभी खरीप पिकेही हाती आलेली असतात. यंदा देशभरातील पावसाचे प्रमाण पाहता खरिपाचे पीकही उत्तम येईल, असे दिसते. थोडक्यात, पहिल्या तिमाहीत झालेला हा उत्तम आरंभ पुढेही कायम राहण्याची शक्यता आहे. या वाढीचा एक ठोस पुरावा म्हणजे, ऑगस्ट महिन्यात वस्तू आणि सेवा कराचे (जीएसटी) संकलन तब्बल एक लाख ४३ हजार कोटी रुपयांवर गेले आहे. हाही विक्रमच आहे. भारतीय अर्थव्यवस्थेने करोनाचे मानसिक आणि प्रत्यक्षातले जोखड आता पुरते फेकून दिले असून, तिचे 'ॲनिमल स्पिरिट' म्हणजे वाढीची अंगभूत आकांक्षा जागी झालेली दिसते. करोनाकाळात अर्थवाढीला फटका बसल्याने बेरोजगारी; तसेच गरिबीच्या रेषेखाली गेलेल्या कुटुंबांची संख्या वाढली होती. आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत बेरोजगारीचा दर ७.६ टक्के झाला आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत हा दर १२.६ टक्के होता. तो प्रत्येक तिमाहीत क्रमाक्रमाने कमी होत गेला आहे. ही समाधानाची बाब आहे. जगभरात रोजगारविहीन अर्थवृद्धी हे एक संकट असते. यांत्रिकीकरण किंवा रोबोंच्या वापरांमुळे आर्थिक विकास तर होत राहतो; पण रोजगार वाढत नाहीत. भारतात सध्या तरी तसे होताना दिसत नाही. अर्थातच, सध्याचाही बेरोजगारीचा दर बराच जास्त आहे. तो पुढच्या काळात आणखी कमी होण्याची आवश्यकता आहे. बेरोजगारीचा दर कमी होण्याचे एक कारण म्हणजे, सेवाक्षेत्रात सातत्याने होत असणारी वाढ. सेवाक्षेत्रात या तिमाहीत १७ टक्क्यांहून अधिक वाढ झाली आहे. सेवाक्षेत्रातील वाढ ही अर्थव्यवस्थेचा पाया भक्कम करतेच असे नाही. ही वाढ अनेकदा अस्थिरही असते. कृषी क्षेत्र; तसेच उत्पादन क्षेत्रातील वाढ ही अधिक महत्त्वाची आणि अर्थकारणाला स्थिरता देणारी असते. कृषी क्षेत्राची वाढ आत्ता केवळ साडेचार टक्के आहे. दुसऱ्या आणि तिसऱ्या तिमाहीचे आकडे बाहेर येतील, तेव्हा हा आकडा वाढलेला असू शकतो. करोनाच्या दुसऱ्या लाटेनंतर भारताची अर्थव्यवस्था नेमकी कधी ताळ्यावर येणार, याविषयी साऱ्या जगात चिंता होती. त्यातच, युक्रेनच्या युद्धामुळे बरीच प्रतिकूलता निर्माण झाली. जगात तळाला गेलेले खनिज तेलाचे भाव चढू लागले. दुसरीकडे, खाद्यतेलांबाबतचे भारताचे परावलंबन त्रासदायक ठरणारे आहे. या सगळ्या बाबी असूनही अर्थकारणाला जी गती आली आहे, तिचे श्रेय देशातील तरुणांच्या उद्यमशीलतेला; तसेच सेवाक्षेत्राच्या अत्यंत कल्पक अशा विस्ताराला द्यायला हवे. आज करोनोत्तर काळात जगातील बहुतेक देशांना विकासाचा जुना वेग अद्याप गाठता आलेला नाही. असे असताना भारताने ते करून दाखवावे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे. अर्थकारणाला ही गती लाभलेली असताना, आता केंद्र सरकारने काय करायला हवे, असा प्रश्न कुणी विचारेल. या प्रगतीची फळे समाजाच्या अगदी शेवटच्या व्यक्तींपर्यंत पोहोचविणे आणि त्यांच्यात जगण्याची प्रेरणा जागविणे, हे काम सरकारला आता करावे लागेल. काही दिवसांपूर्वीच आत्महत्यांची राष्ट्रीय आकडेवारी जाहीर झाली होती. तिच्यात प्रथमच हातावर पोट असणाऱ्या श्रमिकांची टक्केवारी सर्वांत जास्त झालेली आढळली. ही गोष्ट चिंताजनक आणि लांच्छनास्पद आहे. सारी संकटे दूर करून अर्थव्यवस्थेची गाडी वेगाने धावू लागली असेल, तर तिचा लाभ समाजातील शेवटच्या आणि वंचितांच्या वर्गापर्यंत जायला हवा. शेतकरी आणि शेतमजूर यांच्याही आत्महत्या कमी झाल्या, तरच भारतीय अर्थव्यवस्थेने खऱ्या अर्थाने प्रगती केली, असे म्हणता येईल. केंद्र सरकारने अनेक योजनांचे प्रत्यक्ष लाभ लाभधारकांच्या पदरात पडावेत, यासाठी तंत्रज्ञानाची मदत घेतली आहे. अनेक अनुदाने, अंशदाने किंवा कल्याणकारी योजनांचे पैसे थेट खात्यात जमा होतात. ही थेट जमा झालेली आजवरची रक्कम २३ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. असे असेल, तर शेतमजूर किंवा अंगमेहनत करणारे श्रमिक वाढत्या संख्येने आत्महत्या का करीत आहेत, हा संशोधनाचा आणि चिंतेचा विषय आहे. रक्कम थेट देण्यातील तंत्रवैज्ञानिक प्रगती या श्रमिकांच्या आयुष्याला स्पर्श करू शकत नसेल, तर ते योग्य नाही. जीएसटी किंवा इतर करांचे संकलन अभूतपूर्व वेगाने वाढते आहे. हे केंद्र सरकारच्या कार्यक्षम बनलेल्या यंत्रणांचे यश आहेच. हे पैसे कल्याणकारी योजनांमध्ये आणखी कल्पकतेने कसे खर्च करता येतील, याचा विचार आता केंद्राने करायला हवा. गरिबीची लढाई जिंकणे, हेच सरकारसाठी अर्थविकासाचे एक प्रमुख लक्ष्य असते.

# एसटी बसमधून फुकट प्रवास करण्याऱ्या तोतया कर्मचाऱ्यास अटक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एसटी महामंडळाचे सातारा विभागातील कर्मचाऱ्याचे बनावट ओळखपत्र तयार करून त्याद्वारे एसटी बसमधून फुकट प्रवास करणाऱ्या एका ठकसेनाला एटी महामंडळाच्या सुरक्षा अधिकाऱ्यांनी पकडले आहे. संतोष बाळु जाधव (३५) असे या ठकसेनाचे नाव असून सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्याला पनवेल तालुका पोलिसांच्या स्वाधीन केल्यानंतर पोलिसांनी त्याच्या विरोधात बनावटगिरी करून फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

आरोपी संतोष जाधव हा पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यात शटफळ हवेली येथे राहण्यास असून २८ ऑगस्टला तो ठाणे-अलिबाग या एसटी बसमधून प्रवास करून जात होता. ही बस पनवेल-पेण मार्गावरील खारपाडा टोल नाक्यावर आली असताना, एसटी महामंडळाच्या पेण विभागीय कार्यालयातील सुरक्षा व दक्षता अधिकारी शिवनाथ पाखरे, सहाय्यक सुरक्षा निरीक्षक गोविंद गारळे, वाहतूक नियंत्रक रामचंद्र भोसले या तिघांनी सदर बस थांबवून त्यातील प्रवाशांच्या तिकीट तपासणीला सुरुवात केली.

यावेळी आरोपी संतोष जाधव याने त्याच्या जवळ असलेले सचिन जाधव या नावाचे एसटी महामंडळाचे सातारा विभागाचे शासकीय ओळखपत्र दाखविले. मात्र सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्याच्याकडे दुसऱ्या पुराव्याबाबत विचारणा केली असता, त्याने त्याच्याकडील पगार स्लिपची छायांकीत प्रत दाखविली. परंतु सदर स्लीप ही पुण्यातील इंदापूर आगाराची असल्याने सुरक्षा अधिकाऱ्यांना त्याच्यावर संशय आल्याने त्यांनी त्याला उलटसुलट प्रश्न विचारणा केल्यानंतर तो घाबरुन गेला. त्यानंतर त्याने सुरक्षा अधिकाऱ्यांच्या हातातील ओळखपत्र घेऊन एसटी बसमधून पलायन केले.

यावेळी सुरक्षा अधिकाऱ्यांनी त्याचा पाठलाग करून पकडल्यानंतर त्याने सदरचे ओळखपत्र चुलत भाऊ सचिन जाधव याचे असल्याचे तसेच ते बनावट पद्धतीने तयार केल्याचे कबूल केले. त्यानंतर सुरक्षा अधिकाऱ्यांनी सचिन जाधव याला संपर्क साधून त्याच्याकडे देखील बनावट ओळखपत्राबाबत खातरजमा केली असता, त्याने त्याचे ओळखपत्र त्याच्याजवळ असल्याचे सांगितले. त्यानंतर सुरक्षा अधिकाऱ्यांनी आरोपी संतोष जाधवला पनवेल तालुका पोलिसांच्या स्वाधीन केले.

# घरगुती गॅस सिलेंडर नेणाऱ्या टेम्पोला आग

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर परिसरात घरगुती गॅस सिलेंडर नेणाऱ्या एका टेम्पोला लागलेल्या आगीत टेम्पोचे नुकसान झाले आहे.

भारत गॅस या एजन्सी कडून खारघर परिसरात टेम्पोद्वारे घरगुती गॅस सिलेंडर उपलब्ध करून दिले जाते. दरम्यान टेम्पो चालकाने खारघर सेक्टर वीस येथील गॅस एजन्सी कार्यालय लगत उभा असलेला टेम्पो सुरु करून रस्त्यावर बाहेर पडताच टेम्पो चालक बसलेल्या कॅबिनमधून धूर बाहेर पडून अचानक आग लागली.

टेम्पो चालकाने त्वरित जवळच्या दुकानातून बादलीने पाणी टाकून आग विझविली. रात्री रस्त्याच्या कडेला उभी असलेल्या टेम्पोचे वायर उंदीराने कुरतडल्यामुळे शॉक सर्किट होवून अचानक आग लागल्याचे सांगण्यात येत आहे यावेळी टेम्पो मध्ये सिलेंडर नसल्यामुळे पुढील अनर्थ टळला आहे.




# शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत यांना मातृशोक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शिवसेना रायगड-पनवेल जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या मातोश्री स्व.जमुनाबाई नारायण घरत यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्यावर बेलपाडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



स्व.जमुनाबाई नारायण घरत यांचे वयाच्या ९३ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले शिरीष नारायण घरत, रामकृष्ण नारायण घरत यांच्यासह मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्कारावेळी अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

# तळा तालुक्यात १४०८ खाजगी गणपती दीड दिवसाचे विसर्जन

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील १४०८ खाजगी गणपतींचे दीड दिवसाचे गणपती विसर्जन करण्यात आले तळा तालुक्यात एकूण ४१२० खाजगी गणपती आहेत. तालुक्यात एकही सार्वजनिक गणपती उत्सव मंडळ नाही.सर्व देवांचा अधिपती श्री गणेश यांचे भाद्रपद शुद्ध चतुर्थी दिवशी ३१ ऑगस्ट रोजी आगमन होऊन पौराहित्या कडून भाव भक्तीने पूजा अर्चा महाप्रसाद कडून करण्यात आली भजन पूजन नाच अशा विविध कार्यक्रमाने दीड दिवसाच्या गणपती प्रत्येक गावांमधून शहरांमध्ये भावभक्तीने निरोप देण्यात आला.

काही ठिकाणी नदी, तलाव, ओढे खाडी या ठिकाणी विसर्जन करण्यात



येतात तर काही ठिकाणी इको फ्रेंडली विसर्जन करून प्रदूषण रोखण्यासाठी व पर्यावरण रोखण्यासाठी वॉटर टँक म्हणजे टाकीमध्ये विसर्जन केली. काही जणांनी शाडू मातीची मूर्ती आणल्या तर काहींनी पीओपी गणपती मूर्ती खरेदी करून आणल्या होत्या पीओपीपाण्यामध्ये विघटित लवकर होत नसल्याने आराध्य दैवत गणपतीचे काही भागांचे विघटन होत नाही. त्यामुळे पावित्र्य धोका निर्माण होतो या दृष्टिकोनातून काहीजण इको फ्रेंडली विसर्जन करून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी प्रयत्न केला.

या मूर्तींची व निर्माल्य व फुलोरा हे पाण्यामध्ये विसर्जन न करता त्या टँक मध्ये ठेवून काही दिवसांनी त्याचं खत तयार होऊन परत बागेत खत म्हणून वापरता येते असा हा आदर्श घेतला आहे.

तळा तालुक्यात एकूण ४१२० खाजगी गणपती असून पैकी १४०८गणपती विसर्जन झाले तर बाकीचे गणपती विसर्जन होणार आहे.

# नवीन पनवेलमध्ये ज्येष्ठ नागरिकाच्या घरात चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल मध्ये एका ज्येष्ठ नागरिकांच्या घरात ते गावी गेल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने १ लाख ३० हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेल्याची घटना घडली आहे.

नवीन पनवेल सेक्टर १८ मध्ये राहणारे ज्येष्ठ नागरिक भरत गडा गावी गेले असताना चोरट्यांनी त्यांच्या घरामध्ये चोरी केली.

दरवाजाचा कडी कोयंडा तोडून आतमधील चार तोळे वजनाच्या सोन्याच्या बांगड्या, १ तोळे वजनाची सोनसाखळी, १ तोळे वजनाचे पेंडन्ट व डायमंड असलेल्या दोन रिंगा असे १ लाख ३० हजार रुपये किमतीचे दागिने चोरून नेले आहेत.

याविषयी घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# निफाणवाडीमध्ये २० हजार लिटर क्षमतेची पाण्याची टाकी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

निफाणवाडी येथील रहिवाशांना पिण्याच्या पाण्याची सुविधा पुरवण्याच्या उद्देशाने टाटा स्टील फाऊंडेशन या टाटा स्टीलच्या सीएसआर संस्थेने खालापूर तालुक्यातील निफाणवाडीमध्ये २० हजार लिटर क्षमतेची पाणी साठवण्याची टाकी बसवली आहे.या टाकीमुळे निफाणवाडीतील ६२ रहिवाशांना पिण्याच्या पाण्याची सुविधा मिळणार आहे.

ग्रामीण जनतेचे आरोग्य चांगले राहावे यासाठी त्यांना पिण्याचे सुरक्षित पाणी पुरवण्यासाठी टाटा स्टील वचनबद्ध आहे. त्या अनुषंगाने या पाण्याच्या टाकीच्या उद्घाटन प्रसंगी सरपंच प्राची लाड, उपसरपंच नागेश मेहतर, ग्रामपंचायत सदस्य संतोष बैलमारे, स्वाती किलांजे, रुबिना पवार, नम्रता तटकरे, ग्रामसेवक योगेश पाटील आणि टाटा स्टील एज्युकेशनच्या प्रमुख स्मिता अग्रवाल उपस्थित होते.

टाटा स्टील प्लांटच्या आजूबाजूच्या भागातील स्थानिक जनतेला पिण्याचे पाणी पुरवण्यासाठी वॉटरशेड



ऑर्गनायझेशन ट्रस्ट (डब्ल्यूओटीआर) आणि सावरोली ग्राम पंचायत यांनी पाण्याची टाकी बसवण्यासाठी सहयोग दिला. गावात पाण्याची टाकी बसवली जावी ही स्थानिक ग्रामस्थांची बऱ्याच काळापासूनची मागणी यामुळे पूर्ण झाली आहे. याआधी देखील टाटा स्टीलने निफाणवाडीतील २२ घरांच्या नुतनीकरणात मदतीचा हात दिला होता. पर्यावरणपूरक रोजगार, पायाभूत सोयीसुविधांचा विकास आणि आरोग्य सेवा पुरवून टाटा स्टील स्थानिक समुदायांना मदत करत आहे. आता निफाणवाडीमध्ये पुरवण्यात आलेल्या या नव्या सुविधेमुळे कंपनी स्थानिकांना पाणी पुरवू शकते. पाण्याच्या तुटवड्याची समस्या सोडवल्याबद्दल स्थानिकांनी टाटा स्टील फाऊंडेशनचे आभार मानले आहेत.

# इको फ्रेंडली गणपती विसर्जन करून समाजापुढे ठेवला आदर्श

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा येथील महसूल कर्मचारी मोरेश्वर मारूती फुलारे यांनी आपल्या लाडक्या गणपती बाप्पाचे दीड दिवसाचे विसर्जन घरीच मोठ्या प्लास्टिक टॅन्कमध्ये विसर्जन करून नदी तलाव विहीर मधील पाण्याचे प्रद्रुषण होऊ नये. म्हणून शाडू मातीच्या मुर्ती खरेदी केली व पी.ओ.पी.चे बनविलेले गणपतीचे विघटन होत नसल्याने काही अवशेष कित्येक महीने तसेच रहातात त्यामुळे आराध्य दैवत बुध्दीची देवता गणराया यांचे पावित्र्य राखले जावे.या भावनेतून विसर्जन केले व काहि दिवसांनंतर याचे विघटन झालेल्या मातीचा व फुलोरा निर्माल्य याचे खत तयार होऊन परस बागेतील फुल झाडे यांना खतांचा वापर होऊ शकतो.अशा पध्दतीने गणपती विसर्जन करून भावपुर्ण निरोप देऊन गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या या जयघोषात विसर्जन केले. हा इको फ्रेंडली गणपती विसर्जन करून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## विषारी जेली फिश माशांची समुद्रात दहशत

विषारी जेली फिश माशांनी डंक मारला कि मासेमारी करणाऱ्या खलाशांना, कोळी बांधवांना खाज सुटते, अंगावर लाल रंगाचे चटे उठून गाठी,जखमा निर्माण होतात.त्यात वैद्यकीय उपचार योग्य वेळी न मिळाल्यास खलाशी, कोळी बांधव दगावण्याचा संभव असतो. त्यामुळे अशा विषारी जेली फिश माशांमूळे आप आपल्या बोटी किनाऱ्यावर नांगरुन ठेवण्याचा निर्णय काही मासेमारी करणाऱ्या बांधवांनी घेतला आहे.सदर जेली फिश माशांची समुद्रातील दहशत कमी झाल्यावर सर्रास कोळी, खलाशी मच्छिमार बांधव पुन्हा गणेशोत्सवा नंतर मासेमारीसाठी सक्रिय होणार आहेत.

## कशेडी घाटात कोसळलेल्या ट्रकमधून जखमी चालकाला वाचविण्यात यश

चिनारेड्डी (वय५० वर्षे, पदीपाडू, ता.जि.करनूल,) हा गंभीररित्या जखमी झाल्याची माहिती मिळाली. या ट्रकच्या निसटलेल्या हौद्यातील क्लोरिन गॅसचे सिलींडर दरीमध्ये इतस्तत: विखुरले गेले. मात्र, सुदैवाने एकाही सिलिंडरचा स्फोट झाला नाही अथवा क्लोरिन वायू गळती झाली नसल्याने शुक्रवारी सकाळी बचाव व पंचनामा कार्य निविघ्नपणे पार पडले.

पोलीस उपनिरिक्षक भोसले हे याप्रकरणी अधिक तपास करीत असून ट्रक चालक लक्ष्मीरेड्डी चिनारेड्डी यास प्रथम पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये प्राथमिक उपचार करण्यात येऊन पुढील उपचारासाठी जे.जे. हॉस्पिटलमध्ये रवाना करण्यात आले. पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये अपघात र.नं. ११-२०२२ नुसार नोंद करण्यात आली असल्याची माहिती पोलीस सुत्रांनी दिली.

## मुंब्रा येथे दरड कोसळून घरात झोपलेल्या एका महिलेचा मृत्यू

या दरडीत अंदाजे ४×३ फूट आकाराचा दगड वेगाने घरंगळत खाली आला. या भल्या मोठ्या दगडामुळे मुंब्रा बायपास नजीक असलेल्या साईकृपा आणि गजराज सोसायटी या दोन चाळीतील काही घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

या ठिकाणी नुकसान झालेल्या घरात झोपलेल्या एका महिलेचा दुर्देवी मुत्यू झाला आहे. कविता वानपसरे असे या ३५ वर्षीय मृत्यू झालेल्या महिलेचे नाव असून आपत्ती व्यवस्थापन अधिकारी, मुंब्रा प्रभाग समितीचे कार्यालयीन अधिक्षक व त्यांचे कर्मचारी, आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी, ठाणे आपत्ती प्रतिसाद दलाचे प्रतिसादक, वनविभागाचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागचे कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे जवान १- फायर वाहन व १- रेस्क्यु वाहनासह उपस्थित राहून या महिलेचा मृतदेह बाहेर काढून पुढील कार्यवाहीसाठी छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे पाठवण्यात आला आहे.

तसेच सदर ठिकाणी डोंगरावरील आणखी काही दगड कोसळण्याची शक्यता असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने खालील वस्तीमधील एकूण १४ सदनिका रिकाम्या करून रहिवाश्यांची राहण्याची व्यवस्था नजीकच्या ठा.म.पा.च्या शाळेमध्ये करण्यात आली आहे. या ठिकाणी माजी मंत्री तथा स्थानिक आमदार जितेंद्र आव्हाड यांनी देखील घटनास्थळी धाव घेत स्थानिकांची भेट घेतली. शासनाकडून १० लाख दिले जातात ते ठीक आहे, मात्र या डोंगरावर आणखी काही अशे भलेमोठे दगड दिसून येत आहेत आणि ते काढणं गरजेचं आहे नाही तर भविष्यात आणखी असे काही अपघात होण्याची शक्यता आव्हाड यांनी वर्तवली आहे.

कारणा दाखवा नोटीस (सर्वसाधारण नमुना) नमुना ४ अनुसूची १ परिशिष्ट एच — वकील सुमित गुप्ते

**जाहीर नोटीस**

मा.श्री.के.जी.पालदेवार जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधिश-२, पनवेल यांचे न्यायालयात

कमर्शिअल सुट १५/२०१९
नि.नं.४५/ड
ने.ता.१६/०९/२०२२

Shree enterprises Through partner
Vs
Rabiya Usman Narlekar

प्रति,
9-Halima Anwar Shaikh
and adult Indian Inhabitant,
resident of Padgagha,
Taluka-Panvel, Dist-Raigad

ज्याअर्थी, उपरिनामित वादी यांनी या न्यायालयाकडे अर्ज केला आहे की, सोबत प्रत जोडली आहे.

त्याअर्थी याद्वारे तुम्हाला फर्मावण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरुद्ध कारण दाखविण्याकरिता दि.१६/०९/२०२२ रोजी सकाळी ठिक १०.३० वा. या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलांमार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापूर्वी बजावणीकरिता पत्ता देण्यात कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

आज दि.१७ माहे ऑगस्ट सन २०२२ रोजी आमच्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशीदिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**जिल्हा अति.सत्र.न्यायालय, पनवेल**

**सर्व शेअर्स/युनिट्स धारकांना तातडीची सुचना**

अणुशक्ती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., (रजि. क्रमांक आरजीडी/पीडब्ल्यूएल/एचएसजी (टिसी) ५५८ दिनांक १०/०२/९२), पत्ता : मौजे : कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड

आम्ही अणशुक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष व सचिव सदर गृहनिर्माण संस्थेचे सर्व शेअर/युनिट धारक/सदस्य/कब्जेदारांना अशी विनंती करतो की, आपण सर्वांनी दि.१३/०८/२०२२ रोजी घडलेल्या खालील अपघाताची सर्वांनी कृपया गंभीरतेने दखल घ्यावी.

दिनांक ०१/०९/२०२० रोजी कोळखे ग्रामपंचायतीच्या सुचनेनुसार-जावक क्र.९१/२०२०-२१ नुसार आपल्या सोसायटीच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्याबाबत दिले होते. जे आपला संस्थेने मेसर्स बर्वे कन्सल्टंट्स, चेंबुर मुंबई, दि.०७/१२/२०२० यांचे मार्फत करून सबमिट केले. त्यवेळी त्यांनी अनपेक्षित घटना / अपघात टाळण्यासाठी संस्थेच्या सर्व इमारतींच्या मोठ्या तातडीच्या स्ट्रक्चरल दुरुस्तीची सुचना केली होती. त्यामुळे आपल्या सोसायटीने ०३/१२/२०२० रोजी समितीच्या पटलावर २०१२ सालापासून असलेल्या STRUCTURAL REPAIRS आणि REDEVELOPMENT पुनर्विकासाच्या गंभीर मुद्यांवर चर्चा करण्यासाठी विशेष सर्वसाधारण मिटींग (S.G.M.) आयोजित करण्यात आली होती.

परंतु तेव्हापासून अनेक नोटीसी नंतरही आजतागायत कोणीही सदस्यांनी कोणतीही वर्गणी (CONTRIBUTIONS) किंवा कोणतीही अंतर्गत वैयक्तीक, दुरुस्ती अद्याप केलेली नाही आणि तसे सोसायटीला कळविलेले सुद्धा नाही. सर्वांच्या या घोर निष्काळजीपणामुळे आणि अशा महत्वाच्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात न घेतल्याने आणि त्याची प्राधान्याने दखल न घेतल्याने १३/०८/२०२२ रोजी आपल्या संस्थेच्या आवारातील एका इमारतीतील एका फ्लॅटच्या बेडरुमचा स्लॅब दुसऱ्या मजल्यावरुन खाली पहिल्या मजल्यावर पडला. देवाच्या कृपेने दोन्ही फ्लॅटमध्ये कोणीही नसल्यामुळे जिवीतहानी जवळपास चुकी होती. अन्यथा, रहिवाशांच्या जिवीताचे व इतर मालमत्तेचे फार मोठे नुकसान झाले असते. नजीकच्या भविष्यात अटळ असलेली अशी परिस्थिती आणि यापुढे गंभीर अपघात टाळण्यसाठी आम्ही तुम्हा सर्वांना नम्रपणे कळकळीची विनंती करत आहोत की, तुमच्या वैयक्तीक युनिट्स/फ्लॅट्सच्या मधील अंतर्गत तात्काळ दुरुस्तीची कामे अत्यंत तातडीच्या प्राधान्याच्या आधारावर करा आणि सामाईक तातडीच्या स्ट्रक्चरल दुरुस्तीसाठी एकमताने योगदान/वर्गणी द्या. तसेच सोसायटी इमारतींचा तात्काळ पुनर्विकास करण्यास सहाय्य करा.

तसेच अशा धोकादायक आणि जिर्ण फ्लॅट्स/युनिट्स तात्काळ रिक्त करा, तसे न केल्यास, अशा फ्लॅट्स/युनिट्समध्ये राहणारे सदस्य/रहिवासी हेच कोणत्याही मालमत्तेचा किंवा जिवीताला काही नुकसान झाले तर त्यासाठी स्वतःच पूर्णपणे जबाबदार असतील. त्यामुळे पुढे जर असे काहीही घडल्यास अपली गृहनिर्माण संस्था त्यास जबाबदार राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/०८/२०२२

**सही/-**
**अध्यक्ष व सचिव**
**अणुशक्ती. गृह संस्था मर्या. कोळखे, पनवेल**
**मो.क्र.८१०८९११२६६/९८१९१२०९१०**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com



आवरे येथील अश्विन गावंड यांच्या घरातील गणेश मूर्ती



खोपटे बांधपाडा येथील प्रांजळ एकनाथ पाटील यांच्या निवास स्थानी विराजमान झालेली गणेश मूर्ती



दिघोडे येथील श्री शरद आत्माराम कोळी यांच्या घरातील गणेशाची आकर्षक मूर्ती व देखावा



शिंदे गटाचे शिवसेना रायगड उपजिल्हाप्रमुख अतुल भगत यांच्या भेंडखळ येथील निवास स्थानी विराजमान झालेली गणेश मूर्ती



दिघोडे येथील डी. डी. कोळी यांच्या घरातील सुबक गणेश मूर्ती व भारताच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त केलेला देखावा छाया सुनील ठाकूर



रायगड जिल्हा काँग्रेस सरचिटणीस रामनाथ नामदेव पंडित यांच्या दादरपाडा येथील निवासस्थानी विराजमान झालेली गणेश मूर्ती



संजय गांधी निराधार अनुदान योजनेचे मुरुड तालुका अध्यक्ष भरत बेलोसे यांच्या काशिद येथील निवासस्थानी स्थानापन्न झालेली गणरायाची मंगलमूर्ती

मा.इंदलकर साहेब

ॲड.साजिद यु. कच्छी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.ज्यु.मॅजिस्ट्रेट वर्ग १ ला यांचे न्यायालयात

क्रिमिनल एम.ए.नं.९२६/२०२२

कु.नुबेशा शावेज दुस्ते तर्फे वडील
शावेज रफिक दुस्ते — अर्जदार

विरुद्ध

मा.आयुक्त
पनवेल महानगरपालिका — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांचा जन्म दि.०१/११/२०१७ रोजी पनवेल येथील मॅक्स लाईफ हॉस्पिटल, वाझी मोहल्ला येथे झालेला असल्याने अर्जदाराने या न्यायालयात तिच्या जन्माच्या तारखेची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहू अर्जदार यांचा वर नमूद केलेल्या ठिकाणी जन्म झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालयात अर्जदार यांच्याकडे लगेच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे जन्माची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.२२/०८/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल हे खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेतजमीन मिळकत ही सदर मिळकतीचे मुळ मालक १) श्री.श्रीधर हिरामण म्हात्रे, २) श्रीमती.नंदा महादेव खुटारकर, ३) श्री.लहू गोविंद म्हात्रे, ४) श्री.अंकुश गोविंद म्हात्रे, ५) श्री.भगवान गोविंद म्हात्रे, ६) श्रीमती.अपर्णा दिपक निकम, ७) श्री.उमेश माया म्हात्रे, ८) श्री.आशिर्वाद माया म्हात्रे, ९) श्री.दुर्गा हिरामण म्हात्रे, १०) श्री.हरेश हिरामण म्हात्रे यांच्याकडून ५०-५० टक्के स्वरुपात विकसनाकरिता घेण्याचे ठरविले आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे : उसर्ली खुर्द, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| भूमापन नं. | हि.नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| २३ | ० | ०-६१-५० एकूण ०-६१-५० पैकी ०-३०-५० क्षेत्राकरिता | ६.४४ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही भागावर यापूर्वी विक्री, देणगी, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ इत्यादी कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासीत खाली सही करणारे यांचेकडे त्यांच्या खाली दिलेल्या पत्त्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध असे समजून आम्ही सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करू व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचेवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०२/०९/२०२२

**सही/-**
**ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे**
**१४६, पहिला मजला, नगरपालिका कॉम्प्लेक्स, भाजी मार्केट जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६**
**मो.नं.९८९२२२२२५७**

# मदन कोळी यांच्या घरगुती गणेशोत्सवात द्वारका माईचा दीपोत्सवाचा देखावा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेलमध्ये ६२ वर्षाची परंपरा असलेल्या माजी नगराध्यक्ष मदन तुकाराम कोळी यांच्या घरगुती गणेशोत्सवात द्वारका माईचा दीपोत्सवाचा देखावा सादर केला आहे. धार्मिक, सामाजिक, पौराणिक अशा वेगवेगळ्या विषयांवर चलचित्रांचे देखावे सादर करून दरवर्षी आपला गणेशोत्सवाचा वारसा मदन तुकाराम कोळी कुटुंबीय जपत आले आहेत.

लोकमान्य टिळकांना अभिप्रेत असा सार्वजनिक गणेशोत्स-वाचा वारसा जपणारे घरगुती गणेशोत्सवात आपलं आगळं-वेगळं स्थान असलेले पनवेलमधील गेली अनेक वर्षांची परंपरा असणारे तसेच गणेश भक्तांना वेगवेगळ्या देखाव्याद्वारे आकर्षित करणार्या कोळी कुटुंबियांनी यावर्षी शिर्डीचे श्री साईबाबा द्वारका माईचा दीपोत्सव अर्थात चमत्कार साईबाबांचा हा देखावा सादर केला आहे.

शिर्डीचे साईबाबा एक भारतीय संत, गुरु आणि फकीर अवलिया म्हणून जगात प्रसिद्ध आहेत जगभर त्यांचे भक्त आहेत ते त्यांना सर्व शक्तिमान, सर्व व्यापी मानतात. भाविकांना चलचित्राद्वारे साईबाबांनी पाण्याने पेटविलेल्या पणत्या हा साईबाबांचा चमत्कार यावर्षी या घरगुती गणेशोत्सवामध्ये पहायला मिळत आहे. पनवेल आणि परिसरातील भाविक या देखाव्याचे मनोभावे दर्शन घेत आहेत.

पनवेल आणि परिसरात हजारो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या या घरगुती गणेशोत्सवाची सजावट राहुल भोईर, भूषण भोईर व विजय भोईर यांची आहे. पडदा पेटींग रमेश डुकरे, निवेदक अर्थव गोडबोले तर विद्युत रोषणाई पंढरीनाथ शेलार, जनार्दन केणी पनवेल यांनी साकारली आहे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल येथील मिळकत नागेश मन्मथप्पा कनडे यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी जमीन मालक म्हणून आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| नागेश मन्मथप्पा कनडे | ११३/२/२ | ०-७१-५० यापैकी विक्री क्षेत्र ०-५१-५० | ६-५९ |

मौजे : करवले बुद्रुक, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार नागेश मन्मथप्पा कनडे यांचे एकूण क्षेत्र ०-७१-५० हे.आर यापैकी विक्री क्षेत्र ०-५१-५० हे.आर वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खलील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक /कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेल कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दि.०२/०९/२०२२

**सही/-**
**मयुरेश प्र. हनुमंते**
**ॲडव्होकेट-हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग, ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**

Hon'ble Mujawar Judge

Adv. S. G. Acharya

## PUBLIC NOTICE

IN THE COURT OF HON'BLE CIVIL JUDGE SENIOR DIVISION AT PANVEL

Civil M.A. No.1096 of 2022
Exhibit No. 8/D
N.D. 17/10/2022

1. Mrs. Kesharben Kanjibhai Ravriya
Age: 49 years Occ.- Housewife ...Applicant No.1
2. Mr. Haresh Kanjibhai Raveriya
Age: 26 years Occ.-Business ...Applicant No.2
3. Mr. Rajesh Kanjibhai Raveriya
Age: 24 years Occ.-Business ...Applicant No.3
4. Mr. Bhavesh Kanjibhai Raveriya
Age: 23 years Occ.-Business ...Applicant No.4

All the Applicants residing at
B-1302, Highlife Residency,
Plot No.24, Sector-22, Kamothe,
Panvel-410 206.
Mob. No. 86525 47833

V/s

Nil

WHEREAS the above named Applicants have filed the application for Heirship certificate in respect of the immovable property mentioned herein under in the schedule standing in the name of **Mr. Kanjibhai Jakhubhai Ravariya** died on 06.06.2021 at his native place Gujrat leaving behind the Applicant No.1 his wife, Applicant No. 2 and 4 children's as his legal heir.

AND WHERE AS if any person/institution has any objection, title, claim, share of whatsoever nature in the property herein under mentioned then may appear in person or through their advocate, objecting this application, if no one appears and objects, for the same within 30 days from the date of this notice, then this Hon'ble Court will proceed to pass the necessary orders thereon.

**SCHEDULE OF PROPERTY**

**Flat No.1302, 13th Floor, Highlife Residency, Plot No.24, Sector-22, Kamothe, Panvel-410 206.**

Given under my hand and seal of this Court on the 02 day of Sept, 2022 at Panvel.

**Sd/-**
**Jr.Clerk**
**C.C.S.D.Panvel**

Court Seal

**Sd/-**
**Superitendent**
**C.C.S.D.Panvel**



मुरबाडचा राजा मोठा गणपतीचे दर्शन घेताना पत्रकार मुकुंद रांजाणे

अर्जदाराचे वकील : ॲड.विपुल रमाकांत ठाकूर
ॲड.माधवी प्रवीण पाटील

## जाहीर नोटीस

दि.चौ.अर्ज नं.१५६/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२१/१०/२०२२

१) श्री.संतोष शिवराम म्हात्रे
वय : ६३ वर्षे, धंदा : निवृत्त
रुम नं.३, संतोष निवास, दुबे रोड, घरटनपाडा नं.२,
दहिसर पूर्व, मुंबई ४०००६८
२) श्री.सुनील शिवराम म्हात्रे
वय : ५९ वर्षे, व्यवसाय :
रा.बी.एम.सी.बिल्डींग नं.सी/५, रुम नं.२९,
रावळी कॅम्प, सरदार नगर नं.४, रावळी कॅम्प,
फायर ब्रिगेड जवळ, सायन कोळीवाडा,
मुंबई-४०००३७ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.निर्मला शिवराम म्हात्रे यांचे दि.२८/०१/२०२२ रोजी रा.बी.एम.सी. बिल्डींग नं.सी/५, रुम नं.२९, रावळी कॅम्प, सरदार नगर नं.४, रावळी कॅम्प फायर ब्रिगेड जवळ, सायन कोळीवाडा, मुंबई ४०००३७ येथे निधन झाले आहे. कै.निर्मला शिवराम म्हात्रे यांचे पती कै.शिवराम नारायण म्हात्रे यांचे निधन दि.२०/०२/१९९३ रोजी मौजे मुंबई येथे झाले आहे. अर्जदार हे कै.निर्मला शिवराम म्हात्रे यांचे कायदेशीर वारस आहेत. कै. निर्मला शिवराम म्हात्रे यांच्या सामाईक नावे असलेली खालील वर्णनाची मिळकत महाराष्ट्र शासनाने सिडकोकरिता भूसंपादीत केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : बोकडविरा, ता.उरण, जि.रायगड**

| अ.क्र. | गावाचे नाव व युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हि.नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे : बोकडविरा यु.के.नं.१७/८७ | १५ | ७ | ०-१६-८ |
| | | १५० | ४ | ०-१३-७ |

वरील मिळकतीमध्ये वर दिलेले अर्जदार क्र.१ व २, हे कै. निर्मला शिवराम म्हात्रे यांचे वारस असून त्यास आणखी कोणीही वारस नाहीत. अर्जददार यांनी आपणास सदर कामी वारस असल्याचा दाखला मिळावा म्हणून ना.कोर्टात प्रस्तुतचा अर्ज दिलेला आहे. तरी अर्जदार यांच्या वारस असल्याच्या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीस हरकत द्यायची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर वकीलांमार्फत न्यायालयात हरकत न घेतल्यास ना.कोर्ट तत्संबंधी योग्य पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.२३/०८/२०२२ रोजी सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## सारंग येथे इ -पीकाची अधिकाऱ्यांकडून पाहणी

**दै.रायगड नगरी । चौक**

महाराष्ट्र राज्यातील सर्व तालुक्यात ई –पिक पाहणी प्रणालीद्वारे पिक पाहणी करण्याची योजना यशस्वीरित्या राबविण्यात येत आहे, आणि यापुढेही दरवर्षी पिक पाहण्याची प्रक्रिया ई –पीक पाहणी प्रणाली द्वारेच राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे ही सर्व माहिती मा.जमाबंदी अभियुक्त कार्यालय, राज्य समन्वयक पाणी प्रकल्प यांच्याकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे. तलाठी सजा तूपगांव कार्यक्षेत्रातील मौजे सारंग येथे प्रत्यक्ष शेतावर जाऊन ई– पीक पाहणी प्रशिक्षण देण्यात आले. तलाठी सजा तुपगावचे एम आर पापटवार, यांनी स्वतः शेतकरी प्रभाकर देशमुख यांच्या शेतात जाऊन खाते क्रमांक १ मापन गट क्रमांक ७४ /१ जमिनीचे लागवडीलायक क्षेत्र हेक्टर आर ०.७२३० पिकाचा वर्ग निर्भर पीक एक पीक पेरणीच्याया लागवडीच्या दिनांक, याची माहिती घेतली यावेळी साबळे, अनिल मुसळे, संतोष बामणे, यशवंत भालेकर, ज्ञानेश्वर देशमुख, सुरज देशमुख, आदी शेतकरी उपस्थित होते.




### वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


# प्रशासकीय अधिकारी सुरेखा भणगे यांच्या कार्यपद्धतीमुळे स्थानिकांमध्ये समाधान

**दै.रायगड नगरी । माथेरान**

नगरपरिषदेच्या सत्ताधारी गटाचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर संपूर्ण जबाबदारी मुख्याधिकारी सुरेखा भणगे (शिंदे) यांच्या खांद्यावर आ–लेली असताना सुध्दा त्यांनी अधिक जोमाने आणि इच्छा शक्तीच्या बळावर नागरिकांना भेडसावत असणाऱ्या सर्व अडीअडचणीचे निराकरण करण्यासाठी युद्धपातळीवर अनेक कामे तडीस नेल्यामुळे स्थानिकांमध्ये समाधानाचे वातावरण दिसत आहे.

नगरपरिषदेच्या निवडणुका लांबणीवर गेल्यामुळे शासनाने त्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केलेली आहे.आणि या पदाला त्यांनी आपल्या कार्यपद्धतीमुळे उत्तम प्रकारे न्याय दिलेला आहे. अल्पावधीतच त्यांनी इथल्या एकंदरीत भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेऊन गावातील गल्लीबोळातील सुद्धा लहान सहान कामे असोत ती पूर्ण केलेली आहेत.



नागरिकांना भेडसावत असणाऱ्या समस्या दूर करण्यासाठी पावसाळ्यात आपत्कालीन वेळेस त्यांनी आपत्ती व्यवस्थापन हा सोशल मीडियावर गृप तयार करून त्यावर नागरिकांना ज्या ज्या समस्या निर्माण झाल्या होत्या त्या आपल्या कर्मचारी, अधिकारी वर्गाच्या सोबतीने जलदगतीने मार्गी लावल्या आहेत.

अतिवृष्टी काळात एक महिला अधिकारी असताना त्यांनी दिवसरात्र मेहनत घेऊन वारा पाऊस याची तमा न बाळगता आपले कर्तव्य पार पाडले आहे. सर्वांशीच मिळतेजुळते घेऊन लोकांना अभिप्रेत असणारी कामे पूर्णत्वास नेली आहेत त्यामुळे निदान आगामी निवडणुका पूर्ण होईपर्यंत अशा कार्यक्षम प्रशासकांची या दुर्गम पर्यटनस्थळ असणाऱ्या माथेरानला खऱ्या अर्थाने गरज आहे. त्यांची कामगिरी आणि कार्यपद्धती उल्लेखनीय असल्याचे स्थानिकांचे मत आहे त्यामुळेच त्यांनी त्यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ याच ठिकाणी पूर्ण करावा जेणेकरून नागरिकांना वेळोवेळी उद्भवणाऱ्या समस्या वेळीच तडीस जाऊ शकतात असे जेष्ठ नागरिकांमधून तसेच महिला वर्गामधून सुध्दा बोलले जात आहे.

माथेरान शहराला एक चांगल्या मुख्याधिकारी लाभलेल्या आहेत. एक महिला असून मागच्या लोकांनी सत्ता उपभोगली त्यांना जमल नाही ते काम कमी वेळात मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी करून दाखवलं आहे याचा आम्हाला खरोखरच सार्थ आभिमान आहे.काही महिन्यात माथेरानच इलेक्शन येऊन ठेपल आहे पण सध्याचे राजकारण पाहता असं वाटतं की या गावात ह्याच निदान तीन वर्षे मुख्याधिकारी राहिल्या पाहिजेत कमीत कमी दोन-तीन वर्ष तरी राहिल्या पाहिजेत जेणेकरून या गावाचा विकास लवकर होईल आणि न बोलता लोकांची कामे होतील.

**राकेश कोकळे, अध्यक्ष धनगर समाज माथेरान**

अधिकारी हे सहसा सोशल मिडीया पासुन नेहमी दुर राहतात परंतु नागरीक व अधिकारी यांचा मेळ साधला जावा किंवा अडचणी व सुचना त्या माध्यमातून सोडवल्या जाऊ शकतात याचे उत्तम उदाहरण म्हणजे मुख्य अधिकारी यांनी चालु केलेल्या गृपच्या माध्यमातून अनेक समस्या सुटलेल्या आहेत.आणि सगळ्यात महत्वाचे यात कोणताही दुजाभाव नसतो. काही लोकप्रतिनिधींकडून नेहमी नागरीकांचे काम करताना भविष्यात तो मला मतदान करेल का?माझ्या मागे फिरेल का? तरच काम करायचे व त्याच्यावर उपकाराचा अंहमभाव कायम कसा राहील हे बघीतले जाते परंतु प्रशासक म्हणुन भणगे यांनी अल्पावधीतच आपल्या कामाची छाप सोडली आहे. येणाऱ्या प्रत्येक नागरीकांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांचा कल असतो.

**भास्कर शिंदे, उद्योजक माथेरान**

# नगरपंचायतीच्या नो पार्किंग बोर्डाला वाहन मालकांची केराची टोपली

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा नगरपंचायतने एसटी बस व मच्छी मार्केट पासून बळीचानाका परिसरात मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असल्याचे वारंवार वृत्त पत्राचे माध्यमातून प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले असून सध्या नो पार्किंग बोर्ड लावला आहे परंतु वाहन चालकांनी स्वतःची प्रॉपर्टी समजत असून या सणासूदीत वाहनांची संख्यावाढली असतानापरिस्थिती लक्षात न घेता मोटारसायकल दिवस दिवस उभी करून ठेवलेली असल्याचे दिसून येत आहे.

नगरपंचायत प्रशासनाने बाजारपेठेतील देशमुख गीरणी मागे जागेत पार्किंग व्यवस्था केली असून हि वर्दळीच्या रस्त्यावर मोटार सायकल उभी केली जात आहे तसेच किरकोळ व्यावसायीक आपली दुकाने वाढवून अतिक्रमण करून कोंडी करीत आहेत.

प्रमुख ठिकाणी नो पार्किंग झोन बोर्ड लावलेला असे असताना मात्र प्रशासन पोलीस प्रशासनाचे मदतीने धडक कारवाई करित नसल्याने वाहनकोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहे. वास्तव चित्र दिसत आहे. या गंभीर समस्याने दुकानदार, पादचारी, चालक त्रस्त झाले आहेत मोठ्या घटना घडण्याची वाट पहात आहे का असा सवाल केला जात आहे.



# मेडिकल स्टोअरमधील घरफोडीत रोख रक्कमसह इतर साहित्य लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील ठाणे नाका परिसरात असलेल्या बालाजी मेडिकल केमिस्ट अँड ड्रग च्या दुकानात अज्ञात चोरट्याने केलेल्या घरफोडीत रोख रक्कमसह दुकानातील इतर साहित्य चोरीला गेल्याची घटना घडली आहे. ठाणे नाका परिसरात असलेल्या बालाजी मेडिकलच्या दुकानाचे मुख्य शटर अज्ञात चोरट्याने उचकटून आत प्रवेश करून तेथे असलेली रोख रक्कम व इतर साहित्य चोरून नेले आहे. या घटनेची माहिती मिळताच पनवेल शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी रवाना होऊन त्यांनी सीसीटीव्ही फुटेजच्या साहाय्याने आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली आहे.

# दुबई येथील काम सोडून आल्याने केली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुबई येथील काम सोडून विचुंबे येथे परत आल्याने ३४ वर्षे इसमाला दोघांनी मारहाण करून शिवीगाळ केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विचुंबे येथे राहणारे दुर्गेश देवीशरण पटेल हे बँकेचे प्रीपेड कार्ड व कस्टमर सपोर्ट या सेवांसाठी काम करत असताना त्यांच्या बँक खातेमधून पेयू पेमेंट या कंपनीमध्ये २४ लाख १२ हजार रुपये ट्रान्सफर झाले होते. या कंपनीकडून ही रक्कम परत मिळण्यासाठी पत्रव्यवहार केल्यानंतर त्यांना आठ लाख रुपये कंपनीकडून परत मिळाले. उर्वरित रक्कम परत मिळत नसल्याने त्यांनी आरबीआय मध्ये तक्रार केली. त्यानंतर भूपेश अरोरा यांनी कंपनीमार्फत मध्यस्थी करून पाच लाख रक्कम परत केली. त्यानंतर भूपेश अरोरा यांनी त्यांच्यासोबत काम करण्यास विचारले. त्यावेळी पाच लाख डव्हान्स म्हणून त्रयस्थ व्यक्तीच्या बँक खात्यामार्फत त्यांच्या बँक खात्यात पाठवले. त्यामुळे दुर्गेश यांनी त्यांच्यासोबत काम करण्यासाठी होकार दिला. व जून २०२२ मध्ये ते अरोरा यांच्यासोबत काम करण्यासाठी दुबईला गेले.

यावेळी त्यांच्यासोबत सनी वर्मा हे काम करत होते. अरोरा यांचे काम फसवेगिरीचा वाटल्यामुळे हे काम करण्यास जमणार नसल्याचे त्यांनी सांगितले. मात्र परत भारतामध्ये येऊ न देता दुबईमध्येच काम करण्यास सांगून त्यांनी दुर्गेशला धमकावले. त्यानंतर जूनमध्ये अरोरा यांना काहीही न सांगता दुर्गेश हे विचुंबे येथील घरी आले. ऑगस्ट महिन्यात दुर्गेश त्यांच्या कुटुंबासहित घरी बसलेले असताना भूपेश अरोरा, सनी वर्मा व त्यांच्यासोबत दोन इसम असे चौघेजण त्यांच्या घरात आले व सन्नी वर्मा व अरोरा यांनी दुबई सोडून परत का आलास असे बोलून मारहाण करण्यास सुरुवात केली व शिवीगाळ केली.

# पर्ससह सोन्याची साखळी लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील तुकाराम महाराज मंदिर जुने भाजी मार्केट येथे चोरट्याने एका महिलेच्या पिशवीत ठेवलेली छोटी पर्स सोन्याच्या साख–ळीसह चोरून नेली आहे. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आदई येथील प्रगती शेळके ह्या गणेशोत्सवाच्या निमित्त साहित्य खरेदीसाठी व त्यांची सोन्याची पाच तोळ्याची साखळी तुटलेली दुरुस्त करण्यासाठी पनवेल येथे तुकाराम महाराज मंदिर, जुने भाजी मार्केट येथे आल्या होत्या. सोन्याच्या साखळीला डाग देऊन त्यांनी ती छोट्या पर्समध्ये ठेवली व पर्स बाजाराच्या पिशवीमध्ये टाकली. त्यानंतर फळे घेण्यासाठी गेल्यानंतर पैसे देण्याकरता पर्स पाहिले असता पर्स दिसून आली नाही. अज्ञाताने ती पर्स सोन्याच्या साखळीसह चोरून नेली.

# जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वाची मिरवणुकीने सांगता

**दै.रायगड नगरी । कर्जत**

जैन धर्मियांच्या पर्युषण पर्वाची काल सांगता झाली. या निमित्ताने कर्जत शहरातील जैन बांधवांनी भगवान महावीरांच्या मूर्तीची कर्जत शहरातून मिरवणूक काढली व जैन मंदिरात मिरवणुकीची सांगता करण्यात आली. या प्रसंगी मोठ्या संख्येने जैन बांधव व भगिनी उपस्थित होत्या.

जैन मुनीश्री पार्श्वभूषण विजयजी महाराज आणि जैन मुनीश्री लक्षनिधिश्रीजी महाराजांच्या नेतृत्वाखाली मिरवणुक काढण्यात आली. मिरवणुकीमध्ये घोडे सुद्धा सहभागी करण्यात आले होते. गेली दोन वर्षे कोरोनाच्या संकटामुळे हा सोहळा मर्यादित होता. यंदा हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी जैन समाजाचे अध्यक्ष जयंतीलाल परमार, उपाध्यक्ष दिनेश जैन, उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, मोहन ओसवाल, साजन ओसवाल, दिपचंद ओसवाल, पंकज ओसवाल, विक्रम ओसवाल, राजेश ओसवाल, राजेंद्र परमार, जितेंद्र ओसवाल, पंकज परमार, सचिन ओसवाल आदींसह जैन बांधव व भगिनी मोठया संख्येने उपस्थित होत्या.



# सुधागडात दिड दिवसाच्या गणपती बाप्पाचे विसर्जन

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

'गणपती बाप्पा मोरया..पुढच्या वर्षी लवकरच या, अशा जयघोषात सुधागडकरांनी दिड दिवसांच्या बाप्पांना गुरूवारी निरोप दिला. सायंकाळपर्यंत अनेक घरगुती गणेशमूर्तीचे विसर्जन करण्यात आले. विसर्जनादरम्यान अनुचित प्रकार टाळण्यासाठी पाली पोलिसांकडू चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

पाली, पेडली, जांभुळपाडा, परळी, करचुंडे अंबानदीत येथे गणेश विसर्जनाची व्यवस्था करण्यात आली होती. आसमंतात घुमनारा शंखनाद... होणारी फुलांची उधळण... वेगवेगळ्या तालांवरील ढोल–ताशांचा दणदणाट... 'मोरया'चा जयघोष करत वादकांना दिली जाणारी उत्स्फूर्त दाद... पाऊस असला तरी क्षणाक्षणाला वाढणारी गर्दी... नानाविध रूपातील गणरायाचा थाट आणि हे सगळे अनुभवण्यासाठी लोटलेला जनसागर... अशा आनंददायी वातावरणात सुधागडकरांनी गणपतींना गुरुवारी निरोप दिला. सायंकाळी ५वाजल्या पासून सायंकाळी साडेसातपर्यंत गणपतींची विसर्जन मिरवणूक चालली.

बाप्पांचा विसर्जन सोहळा निर्विघ्नपणे पार पडावा, यासाठी पाली पोलिसांचे पथक ठिकठिकाणी तैनात ठेवण्यात आले होते. दिड दिवसांच्या बाप्पांच्या विसर्जनासाठी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.पाच ते दहा दिवसांच्या गणपती विसर्जनाला होणारी गर्दी लक्षात घेऊन बंदोबस्तात वाढ करण्यात येणार असल्याचे पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले.



# सुप आणि सुपल्यांना मागणी वाढली ; सुप विक्रेत्यांना आले सुगीचे दिवस

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

गौरी–गणपतीच्या सणामध्ये गौरी पूजनासाठी आवश्यक असणाऱ्या सुप आणि सुपल्यांना सध्या मोठी मागणी वाढली असून ठिकठिकाणी सुप विक्रेते सुप–सुपल्या विकत असल्याचे दिसून येत आहेत.

एरव्ही घरगुती कामामध्ये व शेतीच्या कामामध्ये सुपांचा वापर केला जात असल्याने ग्रामीण जीवनामध्ये सुपांना अनन्यसाधारण महत्व आहे. तर गौरी–गणपतीच्या सणाला सवाष्ण महिला, बालिका यांना गौरी पुजनासाठी सुपाची आवश्यकता असते. तर या दिवसात नववधू आपल्या माहेरहून विविध फळे, सुका मेवा, पेढे, बर्फी, लाडू तसेच अन्य पदार्थांनी सुपं भरून सासरच्या घरी तसेच सासरकडील आप्तस्वकीय यांना भेट म्हणून देण्याची परंपरागत प्रथा आहे. अर्थातच सुपांचीच आवश्यकता असल्याने सध्या बाजारात सुप विक्रेत्यांना सुगीचे दिवस आले आहेत.

गौरींना पुजनासाठी सुप–सुपल्यांची आवश्यकता असल्याने लाँकडाऊन कालावधीत बंद असलेल्या सुप विक्रेते व्यावसायिक व विक्रेत्यांना सुगीचे दिवस आले आहेत. कोरोना महामारीमुळे अनेक छोट्या मोठ्या व्यावसायिक यांना फार मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला होतो. सध्या बाजारात काही जीवनावश्यक वस्तूंची भाववाढ झालेली दिसत आहे. तर सुपांच्या किंमतीही १५०/– ते २००/–रू.पर्यंत पोहोचल्या आहेत. व खास वेणीची डिझाईन असलेले सुप हे २००/– ते २५०/–ते ३००/–रू.पर्यंत विकले जात असल्याचे दिसून येत आहे.



# सुधागड तालुक्यातील घोटवडे धोकादायक नदी पुलावर वाजतेय धोक्याची घंटा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील घोटवडे येथील गावाला व आदिवासी वाड्यावस्त्यांना जोडणाऱ्या तसेच वाहतूक व दळणवळणाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या पुलाची आजघडीला दयनिय अवस्था झालीय. या पुलाची दुरुस्ती व मजबुतीकरण होणे गरजेचे आहे. परंतू अशा धोकादायक पुलाच्या देखभाल व दुरुस्तीकरिता कोणत्याही प्रकारचा निधी शासनाकडून उपलब्द होत नसल्याने प्रशासन व सरकार पुल कोसळून मोठी जिवीतहाणी घडण्याच्या प्रतिक्षेत आहे का? असा संतप्त सवाल येथील स्थानिकांमधून उपस्थीत केला जात आहे. महाडच्या सावित्री पुल दुर्घटनेनंतर आम्ही काही धडा शिकणार आहोत की नाही असा सूर देखील ज्येष्ट व जाणकारातून आवळला जात आहे. सदर धोकादायक पुलाची लवकरात लवकर दुरुस्ती व मजबुतीकरण करण्यात यावे अशी मागणी ऑल इंडिया पँथर सेना सुधागड– रायगड यांच्याकडून करण्यात आली आहे. अन्यथा येत्या १३ सप्टेंबर ला जिल्हाध्यक्ष नरेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकाध्यक्ष संदेश भालेराव व सहसचिव आवेश भालेराव हे आमरण उपोषणास बसणार असल्याचा इशारा पाली सुधागड चे तहसीलदार दिलीप रायन्नावर यांना निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी पाली पोलीस ठाण्यात उपस्थित असलेले डी वाय एसपी किरणकुमार सूर्यवंशी यांना देखील निवेदन देण्यात आले.



सुधागड तालुक्यातील घोटावडे गाव व आदिवासीवाड्यांना जोडणारा हा पुल सदस्यस्थितीत धोकादायक अवस्थेत आहे. या पुलावरील प्रवास हा वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असून अक्षरशः अखेरची घटका मोजताना दिसत आहेत. रायगड जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या ४५ मिटर लांबी व ५ मिटर रुंदीच्या घोटवडे पुलाचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग पाली सुधागडच्या माध्यमातून सन १९९१ साली करण्यात आले होते. येथील वाहतुक व प्रवासाकरीता अत्यंत महत्वाचा असलेल्या घोटवडे पुलाचा प्रश्न ऐंरणीवर आला आहे. जुना जर्जर व मोडकळीस आलेला हा धोकादायक पुल पुर्णपणे वाकला असून हा पुल केव्हाही कोसळून खुप मोठी दुर्घटना होण्याची दाट भिती निर्माण झाली आहे. या पुलावरुन अवजड वाहणे गेल्यास पुल हळू लागतो. संरक्षण कठडे तुटल्याने वाहने नदीत कोसळून अपघाती घटना घडत आहेत. पावसाळ्यात तर या पुलावर धोक्याची घंटा वाजत आहे. या पुलाच्या बांधकामाला अनेक वर्ष उलटून गेली असल्याने पुलाची दुरावस्था झाली आहे. घोडवडे पुल वाहतुक व प्रवासाच्या दृष्टीने येथील नागरीकांसाठी जिवनवाहीणी ठरत आहे. या पुलावरुन बारमाही वाहतूक सुरु असते. अशातच मागील अनेक वर्षापासून या पुलाची डागडुजी, देखभाल व दुरुस्ती न झाल्याने आजघडीला या पुलाची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. नादुरस्त व कमकुवत झालेल्या या पुलावरुन प्रवास करताना जिव मुठीत घेवून प्रवास करण्याची वेळ येथील ग्रामस्त व नागरीकांवर आली आहे. पुल केव्हा कोसळेल व दुर्घटना घडेल याचा नेम नाही. सदर पुलाच्या दुरुस्तीबाबत प्रशासनाकडून कोणतीही ठोस पाउले उचलली जात नाहीत. त्यामुळे जनतेतून संतापाची लाट उसळली आहे. सावित्री पुल दुर्घटनेच्या पार्श्वभुमीवर राज्य व देशभरातील पुलांकडे प्रशासनाचे व सरकारचे लक्ष वेधले होते. यावेळी ग्रामीण व शहरी भागातील धोकादायक पुलांची माहिती मागवून पुल दुरुस्तीबाबतच्या नौटंकी हालचाली पाहावयांस मिळाल्या. परंतू पुढे मात्र घोडवडे पुलासारख्या अनेक धोकादायक पुलांचा प्रश्न मात्र जैसे थे प्रलंबीत राहिला. घोडवडे पुल हा परळी गावासह मुख्य बाजारपेठ व पाली खोपोली राज्यमार्गाला जोडणारा दुवा मानला जातो. सदर पुल धोकादायक असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले असून या पुलावरुन वाहनांस पुर्णपणे बंदी असल्याचे फलक सबंधीत प्रशासनामार्फत पुलाच्या जवळ लावण्यात आले होते. परंतू आज ते सुचनाफलक गंजलेल्या अवस्थेत असून मोडून पडले आहे. त्यामुळे या धोकादायक पुलाबाबत प्रशासन किती संवेदनशिल आहे याची प्रचिती येते. दरम्यान घोटवडे पुलाची तातडीने दुरुस्ती व्हावी व भविष्यातील संभाव्य धोका टळावा याकरीता येथील पुलाची दुरुस्ती करण्यात यावी अशी मागणी ऑल इंडिया पँथर सेनेकडून करण्यात आली आहे.